# श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

(रजि.क्र.ए-७०८)

श्री क्षेत्र जेजुरी ता. पुरंदर जि.पुणे

## जाहीर निविदा

श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी या न्यासाच्या वतीने खालीलप्रमाणे कामाच्या निविदा मागविण्यात येत आहेत:-

१) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त खालीलप्रमाणे विद्युत रोषणाई करणे.

२) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त पूर्ण पालखी मार्ग व कट्ट्यांची साफसफाई, डागडुजी व दुरुस्ती करणे.

३) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त फटाका आतिषबाजी करणे.

४) श्री खंडोबा मंदिराच्या दक्षिणेकडील बाजूस गटारावर सेंट्रिंग पट्ट्या/चेंबर्स टाकणे.

५) मर्दानी दसरा उत्साहानिमित्त पालखी सोहळ्यामधील खांदेकरी, मानकरी व खंडा स्पर्धक विजेत्यांचा सन्मान करणेसाठी सन्मानचिन्ह पुरविणे.

६) मर्दानी दसरा उत्साहानिमित्त पालखी सोहळ्यामधील खांदेकरी, मानकरी व खंडा स्पर्धक विजेत्यांचा सन्मान करणेसाठी फेटे पुरविणे.

७) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त फुलांची सजावट करणे.

८) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी वस्तू/आर्टिकल्स देणे.

९) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांचा सन्मान करणेसाठी वारकरी टोपी,१००० नग व नॅपकिन - १०० नग पुरविणे.

१०) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त न्यासाच्या अधिकारी, क्लर्क यांना ऑफिशियल २ गणवेश, सुरक्षारक्षक व इतर सेवेकऱ्यांना २ गणवेश व महिला सुरक्षारक्षक व इतर महिला सेवेकरींना २ गणवेश साड्या तसेच नित्य वारकऱ्यांना प्रत्येकी १ पायजमा व १ शर्ट कापड व शिलाईसह तयार करून देणे. (प्रत्येकी २ नग शर्ट-पँट व साड्यांचे दरपत्रकाप्रमाणे टेंडर भरणे.)

११) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त खांदेकरी, मानकरी, ग्रामस्थ, सेवेकरी तसेच बंदोबस्तासाठी येणारे पोलीस कर्मचारी - अधिकारी व कमांडो यांचेकरिता न्यासाचे अन्नदान कक्षात भोजनाची व्यवस्था करणे. (संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

१२) सालाबाद प्रमाणे दसरा उत्सवानिमित्त भाविकांना सुलभ दर्शन देणेकामी गर्दीचे व पालखी सोहळ्याचे नियोजन करणेसाठी कमांडो पुरविणे.

१३) पालखी सोहळ्यासाठी देवसंस्थान लोगोसहित पाणी बॉटल पुरविणे.

१४) दसरा उत्सवानिमित्त भाविक-भक्तांचे स्वागत करणे व उत्सवाची माहितीचे फ्लेक्स छपाई करून गावातील चौकांमध्ये लावणे.

**नियम व अटी**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रीयेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु.५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा दि.२५/०८/२०२६ ते दि.०२/०९/२०२६ पर्यंत स.१० ते सायं.५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई निविदा धारकास कळविण्यात येईल.

५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ **www.khandoba.com** येथे उपलब्ध आहे.

६. प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.

७. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**निविदा जमा करण्याचे ठिकाण : श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी 'मल्हार' भक्तनिवास (दुर्गामाता चौक) जेजुरी, ता. पुरंदर, जि.पुणे**

| | |
|---|---|
| **स्वा/- आशिष मारुती बाठे** | **स्वा/- ॲड. विश्वास गोविंद पानसे** |
| **व्यवस्थापक** | **प्रमुख विश्वस्त** |
| **श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी** | **श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी** |